जा. क्र. माध्य५३[१४]नुतनीकरण/पुवि-९२
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग
पुणे-१यांचे कार्यालय
दिनांक :- ३|८|९२

प्रति,
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर पुणे-२८.

विषय :- १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांच्या आदेशाचे नुतनीकरण करुन १९९२-९३ पासून परवानगी देण्याबाबत...

संदर्भ :- शासन पत्र क्र. एसएसएन १३९२/ ३०६१/माशि-१ शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २९-६-९२.

वरील संदर्भीय शासन आदेशान्वये ज्या माध्यमिक शाळांना सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्यात आलेली होती. त्या शाळांना परवानगी मिळाल्याचे आदेश संबंधीतसंस्थेला उशीरा मिळाल्याने विद्यार्थी संख्येअभावी व इतर अपरिहार्य कारणामुळे त्यावर्षी शाळा सुरु करता आली नाही. याबाबत आपल्या संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन जून १९९० ऐवजी जून १९९२ पासून संबंधीत ठिकाणी शाळा सुरु करण्यास "खास बाब" म्हणून नेहमीच्या अटींची तसेच परवानगी पत्रातील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] संस्थेचे नांव :- महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर पुणे-२८.
२] शाळेचे नाव:- माध्यमिक विद्यालय महंमदवाडी, पुणे.
३] परवानगी द्यावयाच्या वर्ग:- ८ वी
४] माध्यम :- मराठी.
५] पूर्वी ज्या शासन पत्राने परवानगी दिली होती त्या शासन पत्राचा क्रमांक :- एसएसएन १०९०/२२६५/माशि-१ दि. १३-७-१९९०.

अटी:-

१] सदर संस्थेने ३१ जुलै १९९२ पर्यंत वरिल ठिकाणी माध्य. शाळा सुरु न केल्यास त्यांना दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
२] सदर संस्थेने शाळा सुरु केल्यापासून १० दिवसात शिक्षणाधिकारी [माध्य] यांच्या मार्फत शाळा सुरु केल्याबाबतचा लेखी अहवाल या या कार्यालयात सादर करावा.
३] सदर परवानगी पत्रातील अटींची पूर्तता संस्था करीत असल्याचा अहवाल शिक्षणाधिकारी [माध्य] यांचे मार्फत सादर करण्यात यावा.

स्वाक्षरीवरं शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:- शिक्षणाधिकारी [माध्य] जिल्हा परिषद, पुणे-११ यांना कळविण्यात येते की, त्यांनी शाळेची त्वरीत तपासणी करुन तपासणी अहवालासह पूर्तता अहवाल या कार्यालयास पाठवावा.
२/- कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२. यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र आरोग्य मंडळ करिता
सह चिटणीस




महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे

# डॉ. दादा गुजर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय

तरवडेवस्ती, महंमदवाडी हडपसर, पुणे - 411060.

email : dadagujar.secondary@gmail.com फोन : 020-26970552





मान्यता क्र. एस्. एस्. एन्. / 2265 मा. शि. 1

Pay Unit Code No. PNA-571

संस्था कोड : 272517SC003

स्थापना 22 जून 1992

S.S.C. Code No. - 1105040

H.S.C. Code No. - 1115049

UDISE - 27251700311


जा. क्र. 109

दिनांक : 28/10/ 2023

## * हमीपत्र *

मी देविदास महारु पाटील अशी हमी देतो की, शाळेची मान्यतेची काही कागदपत्र मुळ नाहीत ती झेरॉक्स आहेत. परंतु ती खरी आहेत मुळ कागदपत्र संस्थेत आहेत. त्या मुळे झेरॉक्स प्रती स्कॅन केल्या आहेत.

आपला विश्वासू

[signature]

मुख्याध्यापक

डॉ. दादा गुजर माध्यमिक विद्यालय

महंमदवाडी, पुणे ६०.